# नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
## महाराष्ट्र राज्य,पुणे.

### परिपत्रक

विषय :- महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून), नगरपालिका, प्रभावक्षेत्र व ग्रामीण क्षेत्राच्या वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार मूल्याकन करताना अंमलात आणावयाच्या मार्गदर्शक सूचना क्र.१७ - स्थूल जमिनीच्या (bulk land) - मूल्यांकनाबाबत.

विषयात नमूद क्षेत्रातील स्थूल जमिनीचे (bulk land) मूल्यांकन करताना संबंधित जमिनीचा वार्षिक मूल्यदर तक्त्यात नमूद दर व मार्गदर्शक सूचना क्र. १७ मध्ये नमूद केलेली टक्केवारी विचारात घेतली जाते. या मार्गदर्शक सूचनेच्या शेवटी खालीलप्रमाणे टीप नमूद आहे.

**टीप**:- वरील कोष्टक वापरतांना प्रत्येक टप्प्यामध्ये मूल्य निर्धारीत करतांना त्या जागेच्या क्षेत्रफळानुसार येणा-या टप्प्यांच्या आधीच्या टप्प्यातील / क्षेत्रानुसार येणाऱ्या मूल्यामध्ये उर्वरित क्षेत्राचे मूल्य समाविष्ट करुन मूल्य निर्धारीत करावे.

वरील टीपेमध्ये नमूद केल्यानुसार मूल्यांकन करावयाचे क्षेत्र ज्या टप्प्यात येते त्या आधीच्या टप्प्यातील क्षेत्राचे मूल्यांकनामध्ये उर्वरित क्षेत्राचे मूल्यांकन मिळवून एकूण मूल्यांकन निश्चित केले जाते. मात्र या मार्गदर्शक सूचनेनुसार मूल्यांकन करताना काही ठिकाणी जास्त क्षेत्राचे मूल्यांकन कमी व कमी क्षेत्राचे मूल्यांकन जास्त येत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही त्रुटी दूर करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**टीप**:-मार्गदर्शक सूचना क्र.१७ मध्ये नमूद केलेल्या सर्व टप्प्यातील मूल्यांकनांची बेरीज करुन मूल्यांकन निश्चित करण्यात यावे.

उदाहरणार्थ एखाद्या मूल्यविभागातील खुल्या जमीनीचा दर रु.६,६५०/प्रती चौमी आहे व मूल्यांकनाखालील क्षेत्र १०,०५० चौमी असल्यास तिचे मूल्यांकन खालीलप्रमाणे निश्चित करावे.

उदाहरण :- ५०० X ६६५० X १.० = रु.३३,२५,०००/-
१५०० X ६६५० X ०.९० = रु.८९,७७,५००/-
२००० X ६६५० X ०.८० = रु.१,०६,४०,०००/-
६००० X ६६५० X ०.६० = रु.२,३९,४०,०००/-
५० X ६६५० X ०.५० = रु.१,६६,२५०/-
एकूण रु.४,७०,४८,७५०/-

**ही सूचना दि.१.४.२०११ पासून अंमलात येईल.**

जा.क्र.का.१५/वामुद-२०११/मा.सू.क्र.१७/२३३
नवीन प्रशासकिय इमारत,
तळमजला, विधानभवन समोर,
पुणे-४११ ००१.
दि.२९.३.२०११.

(एस. चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत** शासनाच्या महसूल व वन विभागाकडील दि. २९.४.२००८ च्या निर्णय क्र. जमीन-११/२००७/प्र.क्र.९८/ज-१ च्या संदर्भात माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ यांना सादर.
२) मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ यांना सादर.
३) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग / पुणे विभाग / नाशिक विभाग / नागपूर विभाग / औरंगाबाद विभाग / अमरावती विभाग यांना सादर.

४) जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे / रायगड, अलिबाग / रत्नागिरी / सिंधुदुर्ग, ओरोस /नाशिक/ धुळें / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / बुलढाणा /अकोला / वाशिम / अमरावती / यवतमाळ / वर्धा/ नागपूर / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर / गडचिरोली.

**हे परिपत्रक त्यांच्या अखत्यारीतील संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आणून देण्याची विनंती आहे.**

५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६) उपसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, मुंबई प्रदेश, मुंबई

७) सहायक संचालक,नगर रचना, मूल्यांकन, नाशिक/अमरावती/नागपूर/पुणे/कोकण विभाग/औरंगाबाद.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.

२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/ अमरावती/ठाणे/ मुंबई/लातूर विभाग.

३) सहजिल्हानिबंधक, ठाणे (शहर) / ठाणे (ग्रामीण) / रायगड, अलिबाग / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर /पुणे (शहर) / पुणे (ग्रामीण) / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / बुलढाणा / अकोला / वाशिम / अमरावती / यवतमाळ / नागपूर (शहर)/ नागपूर (ग्रामीण) / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर / गडचिरोली.

**हे परिपत्रक त्यांच्या अखत्यारीतील संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आणावे.**

४) सर्व दुय्यम निबंधक (संबंधित सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्यामार्फत)

...